SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART TWO

Thursday, the 26th September, 2019

NOTIFICATION

No. 124 /2019 Dated :- 26/09/2019

Sub:- Extension in conferment of autonomous status to H.V.P. Mandal's Degree College of Physical Education, Amravati

Ref :- University Notification No. 11/2008 dt. 26.02.2008

Whereas the above mentioned college has been granted autonomous status, vide above notification and also subsequently granted extension in the period from time to time, to the courses

AND

Whereas, the University Grants Commission vide letter No. F22-1/2017(AC) Dt. 28 June, 2019 has granted ex-post facto approval from 2013-2014 to 2018-2019 academic session also granted approval to autonomous status for the period of 5 years from 2019-2020 to 2023-2024 session

AND

Whereas, the Hon'ble Vice-Chancellor has accepted the above mentioned UGC approval u/s 12 (7) of Maharashtra Public Universities Act, 2016 on behalf of Academic Council and Management Council.

Therefore, it is notified for general information of all concerned that, the Sant Gadge Baba Amravati University grants the autonomous status to H.V.P. Mandal's Degree College of Physical Education, Amravati from 2019-2020 to 2023-2024 session under uniform statute No. 3 of 2019 with ex-post facto approval from 2013-14 to 2018-19 session as approved by University Grants Commission vide its letter mentioned above under UGC (conferment of autonomous status upon colleges and measures for maintenance of standards in autonomous college) Regulations – 2018.

Sd/-
Registrar,
Sant Gadge Baba Amravati University

अधिसूचना

क्रमांक : १२५/२०१९ दिनांक : २६.९.२०१९

विषय :- **नविन महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने खाली दर्शविलेले नविन महाविद्यालये सुरु करण्यास शासन आदेशात नमुद केलेल्या अटींच्या अधिन राहुन कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीत्यांचे अहवाल विद्वत परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरीक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

तसेच शासन निर्णयातील अटी व शर्तीचे, संस्थेने/महाविद्यालयाने पालन करावे तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ चे कलम १०८ नुसार त्वरीत हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक आहे.

तक्ता

अ. क्र.	संस्थेचे नांव व पत्ता	महाविद्यालयाचे नांव व ठिकाण	विद्याशाखा अभ्यासक्रम	प्रवेश क्षमता	संलग्निकरणाचा कालावधी	शासन निर्णय क्र. व दि.
१.	२.	३.	४.	५.	६.	७.
१.	महल्ले पाटील संस्था, शिरपुर (होरे) ता.देवळी, जि. वर्धा	के.टी. महाविद्यालय, सावरगांव, ता.कळंब, जि. यवतमाळ.(९१०)	बी.ए.भाग-१ (इंग्रजी,मराठी,इतिहास, समाजशास्त्र,राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, गृहअर्थशास्त्र, भुगोल)	१२०	सत्र २०१९-२०	शासन आदेश क्र.मान्यता-२०१८/(१००/१८)/मशि-४, दि. १५ जुन, २०१८.
			बी.कॉम. भाग-१ (अभ्यासक्रमिकेनुसार)	१२०		

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****